सांध्य दैनिक
# विदर्भ प्रजासत्ताक
https://epaper.vidarbhaprajasattak.com, follow us on
E-Mail : prajasattaknews24@gmail.com RNI No. - MAHMAR 2023/84526 Postel Regi. No. - AMT/RNP 546/2024-2026
❑ वर्ष - ४ थे ❑ अंक - ९० वा ❑ अमरावती (महाराष्ट्र) ❑ शुक्रवार दि. १५ मे २०२६ ❑ संपादक - डॉ. शुभांगी जोशी ❑ मुल्य - १ रु. ❑ पृष्ठ -४

## मान्सून २४ तासात अंदमानात दाखल होणार





**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.१६ मुंबई–** राज्यातील तापमानात मोठी वाढ झाली असून वाढत्या उकाड्यामुळे नागरिक प्रचंड हैराण झाले आहे. राज्यातील अनेक जिल्ह्यातील तापमान ४५ अंश सेल्सिअसपर्यंत पोहचले आहे. प्रमुख शहरातील तापमानात देखील कमालीची वाढ झाली आहे. नागरिकांच्या अंगाची अक्षरश: लाहीलाही होत आहे. शेतकऱ्यांपासून सर्वजण पावसाची वाट पाहत आहेत. अशातच मान्सूनबाबत मोठी अपडेट समोर आली आहे. मान्सून येत्या २४ तासांत अंदमानमध्ये धडकणार असल्याचे सांगितले जात आहे. त्यानंतर हळूहळू पुढे सरकत २६ मेपर्यंत मान्सून केरळमध्ये दाखल होण्याचा अंदाज वर्तवला जात आहे. नैऋत्य मोसमी वाऱ्यांसाठी पोषक वातावरण अंदमानात तयार झाले आहे. दक्षिण बंगालच्या उपसागरात तसंच अंदमानात ढगांचे प्रमाण वाढले आहे. त्याचसोबत बंगालच्या उपसागरामध्ये कमी दाबाचा पट्टा निर्माण झाला आहे. त्यामुळे मान्सूनला पोषक वातावरण निर्माण झाले आहे. हवामान खात्याने दिलेल्या माहितीनुसार, पुढच्या २४ तासांत मान्सून अंदमानात दाखल होणार आहे. हे पोषक वातावरण असेच कायम राहिल्यास मान्सून २६ मेपर्यंत केरळमध्ये दाखल होईल. केरळनंतर मान्सून पुढच्या सात ते आठ दिवसांत कोकण किनारपट्टीत पोहचेल. त्यामुळे शेतकऱ्यांसाठी ही आनंदाची बातमी आहे.

हवामान तज्ज्ञांच्या मते, 'एल निनो'च्या प्रभावामुळे मान्सूनच्या हालचालींमध्ये बदल होत असून, यंदा तो लवकर येण्याचे संकेत आहेत. तसेच, खचऊ च्या अंदाजानुसार, अनुकूल हवामानामुळे मान्सून ६ जून रोजी कोकणात दाखल होणार आहे. त्यामुळे उकाड्याने हैराण झालेल्या कोकणकरांना दिलासा मिळण्याची अपेक्षा आहे.

## महाराष्ट्रात पेट्रोल-डिझेल दरवाढीचा भडका उडाला
### पेट्रोल-डिझेल दरवाढीमुळे सर्वसामान्याना बसणार महागाईची झळ



**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.१५अमरावती–** केंद्र सरकारने सर्वसामान्यांना पहाटे ६ वाजता मोठा धक्का दिला आहे. राज्यासह संपूर्ण देशात पेट्रोल-डिझेल दरवाढीचा भडका उडाला आहे. देशातील विविध भागात पेट्रोल ३.१४ रुपये आणि डिझेलचा दर ३.११ रुपयांनी वाढला आहे. तेल कंपन्यांनी मध्यरात्री पेट्रोल-डिझेलच्या दरवाढीबाबत इमेल करून माहिती दिली. दूध, सीएनजी दरवाढीनंतर पेट्रोल-डिझेलचे दर वाढल्याने जीवनाश्यक वस्तूंच्या किंमती वाढण्याची शक्यता आहे. महाराष्ट्रातील विविध जिल्ह्यात पेट्रोल-डिझेल दरवाढीचे परिणाम दिसून येतील.पेट्रोल-डिझेलचे दर वाढल्याने थेट सर्वसामान्यांच्या खिशावर परिणाम होणार आहे. याआधी अमूल आणि मदर डेयरी कंपन्यांनी दूधाच्या दरात २ रुपयांनी वाढ केली. सीएनजीच्या दरातही वाढ झाली आहे. आंतरराष्ट्रीय बाजारात कच्च्या तेलाचे भाव कडाडल्यामुळे दरवाढ करण्यात आली आहे.

#### अमरावतीत महागाईचा बॉम्ब

अमरावतीतही पेट्रोल-डिझेलच्या दरात वाढ झाली आहे. अमरावतीत पेट्रोलचे दर १०८ रुपये २४ पैसे प्रति लिटर तर डिझेल ९४ रुपये ७४ पैसे इतक्या रुपयांवर पोहोचले आहेत. मध्यरात्रीपासून अमरावतीमध्ये पेट्रोलच्या किमतीमध्ये प्रतिलिटर ३ रुपये १३ पैशांची वाढ झाली आहे. यापूर्वी अमरावतीमध्ये पेट्रोलचे दर १०४ रुपये ११ पैसे तर डिझेल ९१ रुपये ६३ पैसे इतके होते. भारत आणि इराण युद्धाच्या पार्श्वभूमीवर पेट्रोल डिझेलच्या किमतीमध्ये मोठी वाढ झाली आहे. आता शेतीच्या मशागतीची वेळ असताना पेट्रोल आणि डिझेलची दरवाढ झाल्याने याचा फटका शेतकऱ्यांना बसणार असल्याची प्रतिक्रिया शेतकऱ्यांनी बोलून दाखवली आहे.

## पंतप्रधान मोदींच्या युएई दौऱ्यात LPG आणि पेट्रोलचा मोठा करार...



**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.१५अबुधाबी** इराण, इस्रायल आणि अमेरिका यांच्यात सुरू असलेल्या संघर्षामुळे जगभरात भीषण ऊर्जा संकट निर्माण झाले आहे. या संकटाचा भारतावरील परिणाम कमी करण्यासाठी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी एक मोठा धोरणात्मक निर्णय घेतला आहे. पंतप्रधानांनी आपल्या संयुक्त अरब अमिराती(ण-ए) दौऱ्यात ङ्झऋपुरवठा आणि धोरणात्मक तेल साठे संदर्भात अत्यंत महत्त्वाच्या करारांवर स्वाक्षऱ्या केल्या आहेत.

भारतात पेट्रोल आणि डिझेलच्या दरात प्रति लिटर ३ रुपयांची वाढ झाल्यानंतर अवघ्या काही तासांतच हे करार करण्यात आले आहेत, ज्यामुळे या घडामोडीला मोठे महत्त्व प्राप्त झाले आहे.

पंतप्रधान नरेंद्र मोदी भारत-नॉर्डिक शिखर परिषदेसाठी जात असताना त्यांनी अबुधाबी येथे अवघ्या दोन तासांचा 'स्टॉपओव्हर' (थोड्या वेळासाठी मुक्काम) घेतला. या अत्यंत महत्त्वाच्या दौऱ्यात त्यांनी युएईचे राष्ट्राध्यक्ष शेख मोहम्मद बिन झायेद अल नह्यान यांची भेट घेतली खालील महत्त्वपूर्ण करारांवर शिक्कामोर्तब केले.

## शिवसेना पक्ष, चिन्हाविषयी SC मध्ये सुनावणी
### कोर्टाने टोचले ठाकरे गटाचे कान
#### बेजबाबदार विधाने करण्यापासून दूर राहण्याचा इशारा



**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.१५मुंबई–** सर्वोच्च न्यायालयात आज शिवसेना पक्ष व चिन्हाविषयी संक्षिप्त सुनावणी पार पडली. या सुनावणीत सरन्यायाधीशांनी या खटल्याच्या विलंबाविषयी ठाकरे गटाच्या नेत्यांकडून करण्यात येणाऱ्या अनावश्यक विधानांवर तीव्र नाराजी व्यक्त केली. प्रस्तुत प्रकरण सूचिबद्ध केले जाते, तेव्हा तुम्ही तारीख द्या म्हणता आणि नंतर माध्यमांमध्ये जाऊन बेजबाबदार विधाने करता. हे आम्ही सहन करणार नाही. सर्वप्रथम तुम्ही तुमच्या लोकांना माध्यमांत जाऊन सर्वोच्च न्यायालय निर्णय घेत नाही अशी बेजबाबदार विधाने करण्यापासून रोखा, असे कोर्ट ठाकरे गटाच्या वकिलांना ठणकावण्याच्या सूरात म्हणाले. शिवसेना पक्ष व चिन्हाशी संबंधित याचिकांवर आज सर्वोच्च न्यायालयात सुनावणी झाली. या सुनावणीत शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे वकील देवदत्त कामत यांनी या प्रकरणावर लवकर सुनावणी घेण्याची मागणी केली. त्यावर सरन्यायाधीश सूर्यकांत यांनी देवदत्त कामत यांना चांगलेच खडेबोल सुनावले. सर्वप्रथम तुम्ही तुमच्या लोकांना माध्यमांमध्ये जाऊन सुप्रीम कोर्ट निर्णय घेत नाही अशी बेजबाबदार विधाने करण्यापासून रोखा. आम्ही दोन्ही पक्षांकडून सहकार्याची अपेक्षा करतो, असे ते म्हणाले.

## राज्यात ६ महिने कोणताही मोठा कार्यक्रम नाही
### मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची घोषणा



**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.१५मुंबई–** पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या आवाहनानंतर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी शुक्रवारी राज्यात पुढील ६ महिन्यांपर्यंत कोणत्याही मोठ्या कार्यक्रमांचे आयोजन केले जाणार नसल्याची घोषणा केली. आज जगावर एक मोठे संकट आहे. या संकटाच्या काळात पंतप्रधान मोदींनी आपल्याकडून काही अपेक्षा व्यक्त केल्या आहेत. त्यानुसार सरकार पुढील ६ महिने कोणत्याही मोठ्या कार्यक्रमांचे आयोजन करणार नाही, असे ते म्हणालेत. सरकारने इतर देशांच्या तुलनेत केवळ साडे ३ टक्क्यांची दरवाढ केल्याचा दावाही त्यांनी यावेळी केला.

साताऱ्यात आज प्रधानमंत्री आवास योजना (ग्रामीण) लाभार्थी मेळावा व महाआवास अभियान राज्यस्तरीय पुरस्कार वितरण समारंभ सोहळा पार पडला. यावेळी बोलताना मुख्यमंत्री म्हणाले, सरकारने मागच्या २ वर्षांत ५० लाख लाडक्या बहिणींना लखपती दीदी केले. पण आम्ही एवढ्यावरच थांबणार नाही. आमच्या १ कोटी बहिणी लखपती दीदी होतील. त्या खऱ्या अर्थाने आपल्या अर्थव्यवस्थेचे संचालन करतील. मोदींनी हेच ओळखले. देशाची अर्थव्यवस्था ५ ट्रिलियनची करायची असेल, तर केवळ भावांच्या भरवशावर राहून चालणार नाही. त्यासाठी बहिणींनाच अर्थव्यवस्थेत आणावे लागेल. त्यामुळे बहिणी याकामी उतरल्या तर देशाची अर्थव्यवस्था ५ ट्रिलियन झाल्याशिवाय राहणार नाही.ज्यावेळी देश संकटात असतो, ज्यावेळी जगावर संकट असते, अशा काळात मोदींनी काही अपेक्षा व्यक्त केल्या, तर आपण आपापल्या परीने त्या अपेक्षांकृत काम करणे ही आपली जबाबदारी आहे. आपण देशभक्त आहोत. देशभक्ती ही अशा परिस्थितीत आपण किती देशासाठी त्याग करू शकतो यावर अवलंबून असते. मोदींनी आपल्याकडून फार मोठा त्याग अपेक्षित केला नाही. याठिकाणी परकीय चलन वाचवण्यासाठी ६ महिने सोन्याची खरेदी करू नका, इंधन वाचवता येईल तेवढा वाचवा, खतांचा निर्बंध वापर करू नका असे ते म्हणालेत. त्यासाठी त्यांनी वेगवेगळ्या उपाययोजना त्यांनी सांगितल्या आहेत. प्रत्येक देशभक्त भारतीय आणि हा महाराष्ट्र तर छत्रपती शिवरायांचा आहे. या महाराष्ट्रपती शिवरायांनी सांगितल्यानंतर आपला जीव देण्यासाठीही आपले मावळे तयार राहत होते. अशा या महाराष्ट्रात आपापल्या परीने जे जे शक्य आहे ते ते आपण करूया, असे मुख्यमंत्री फडणवीस यावेळी बोलताना म्हणाले.

## अशोक खरातसोबतच्या फोटोवर चाकणकरांचे स्पष्टीकरण
### म्हणाल्या - गुरूसोबत देवीचे दर्शन घेता यावे या हेतूने आम्ही गुवाहाटीला गेलो होतो



**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.१५मुंबई–** राज्य महिला आयोगाच्या माजी अध्यक्षा रुपाली चाकणकर यांचा भोंदू अशोक खरातसोबतचा गुवाहाटीतील एक फोटो सोशल मीडियात व्हायरल झाला आहे. चाकणकरांनी या फोटोवर स्पष्टीकरण देत आपल्याला आपल्या गुरूसोबत देवीचे दर्शन करता आले तर छानच होईल हा अध्यात्मिक भाव ठेवून आम्ही स्वतंत्रपणे पुण्याहून गुवाहाटीला दर्शनासाठी गेलो होतो, असे स्पष्टीकरण दिले आहे.

ईडीने गुरुवारी भोंदू अशोक खरात प्रकरणात सत्ताधारी राष्ट्रवादी काँग्रेसच्या नेत्या रुपाली चाकणकर यांची तब्बल ८ तास चौकशी केली. या चौकशीनंतर पत्रकारांशी संवाद साधताना त्यांनी अशोक खरातच्या कुटुंबासोबतच्या गुवाहाटीतील फोटोवर भाष्य केले. त्या म्हणाल्या, अशोक खरातचे कुटुंब अगोदर गुवाहाटीला गेले होते. त्यानंतर आम्ही कुटुंबासोबत तिकडे गेलो होतो. आपल्या गुरुसोबत दर्शन घेण्यासाठी आम्ही गेलो होतो. अनेकांची श्रद्धा होती. आमचीही होती.

गुवाहाटीचा जो फोटो सध्या समोर आला आहे. त्या फोटोमध्ये खरात व माझे कुटुंबीय आहेत. यापूर्वी गुवाहाटीला माझ्या कुटुंबाने देवीचे दर्शन घेतले नव्हते. त्यामुळे आपल्याला आपल्या गुरुसोबत देवीचे दर्शन करता आले तर किती छान होईल असा अध्यात्मिक भाव ठेवून आम्ही स्वतंत्रपणे पुण्याहून प्रवास करून गेलो होतो. त्यानंतर गुवाहाटीत आम्ही अशोक खरातसोबत देवीचे दर्शन घेतले होते.

**अशोक खरातशी आर्थिक संबंध नाहीत–** रुपाली चाकणकरांनी यावेळी अशोक खरातसोबत आपला कोणताही आर्थिक व्यवहार नसल्याचेही स्पष्ट केले. त्या म्हणाल्या, तपास यंत्रणांनी मला जेव्हा केव्हा चौकशीला बोलावले, तेव्हा तेव्हा मी आले. शिर्डी पोलिस ठाण्यात माझ्या बहिणीचीही चौकशी झाली. अशोक खरात प्रकरणात आमचा कोणताही संबंध नाही. या प्रकरणी एसआयटीचे प्रश्न वेगळे होते. पोलिसांचे प्रश्न वेगळे होते. समता पतसंस्थेत मी कधीही गेले नव्हते. समता पतसंस्थेत बोगस खाती आहेत. या खात्यांशी किंवा या पतसंस्थेशी माझ्या बहिणीचा कोणताही संबंध नाही. खरातसोबत आमचा कोणताही आर्थिक व्यवहार नाही.

## संत्री आयात ड्युटी रिफंड योजना बंद; धरणांतील गाळ आणि वाळू काढून जलसाठा वाढवणार
### महाराष्ट्र सरकारचे शेतकऱ्यांसाठी नवे निर्णय




**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.१५मुंबई –** महाराष्ट्र सरकारने शेतकऱ्यांसाठी एक महत्त्वाचा निर्णय घेतला आहे. त्यांचे उत्पादन आणि धरणांमधील टाकाऊ पदार्थ यापुढे वाया जाऊ दिले जाणार नाहीत. यासाठी एक सुधारित धोरण सादर करण्यात आले आहे. राज्यातील सहा प्रमुख प्रकल्पांमधून प्रायोगिक तत्त्वावर गाळ आणि वाळू काढण्यात येईल. यामुळे धरणांमधील पाणीसाठा वाढेल आणि कचऱ्याचा योग्य वापर करणेही शक्य होईल.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली गुरुवारी झालेल्या मंत्रिमंडळाच्या बैठकीत पाणीसाठा, संत्र्यांवरील आयात शुल्क परतावा योजना रद्द करणे, वैद्यकीय शिक्षण संस्थांच्या इमारतींना ५० टक्के सूट यासह १३ महत्त्वाचे निर्णय घेण्यात आले. मंत्रिमंडळाच्या बैठकीत संत्र्यांवरील आयात शुल्क परतावा योजना रद्द करण्याचा निर्णय घेण्यात आला. बांगलादेशला निर्यात होणाऱ्या संत्र्यांवर आयात शुल्कात ५० टक्के अनुदान मिळत होते.

या योजनेचा राज्यातील शेतकऱ्यांना फायदा होत नसल्यामुळे हा निर्णय घेण्यात आला. ठरल्याप्रमाणे, सिंचन प्रकल्पांच्या जलाशयांमधून गाळ आणि गाळमिश्रित वाळू काढण्यासाठी सुधारित धोरण लागू केले जाईल. यामुळे जलसाठा वाढेल, शेतकऱ्यांना मुबलक गाळ मिळेल आणि धरणांचे संरक्षण होईल. नाशिक जिल्ह्यातील आंबोली-वेलुंज ओढा वळवण प्रकल्पाला ४९.२६ कोटी रुपयांची मंजुरी देण्यात आली आहे.

पुढील तीन वर्षांसाठी कोकणातील सिंधुदुर्ग आणि रत्नागिरी जिल्ह्यांमध्ये सिंधुरत्न समृद्धी योजना २.० राबविण्यात येईल. खाजगी अनुदानित निवासी उच्च माध्यमिक आश्रम शाळांमधील शिक्षकांना १२ आणि २४ वर्षांच्या नियमित सेवेनंतर चट्टोपाध्याय आयोगानुसार वरिष्ठ वेतनश्रेणी आणि निवडश्रेणी लागू करण्यास मंजुरी देण्यात आली आहे. नाशिकच्या कुसुमाग्रज प्रतिष्ठानला शैक्षणिक वर्षापासून दरवर्षी १० लाख रुपयांच्या अनुदान योजनेअंतर्गत निधी दिला जाईल.

नाशिक रिंग रोड प्रकल्पासाठी आवश्यक असलेल्या जमिनीच्या खरेदीवरील मुद्रांक शुल्कात सवलतीस मंजुरी देण्यात आली. मृदा व जलसंधारण विभागाच्या सुधारित रचनेला अंतिम स्वरूप देण्यात आले. राज्यात अंदाजे ८,७६७ पदांना मंजुरी देण्यात आली आहे, ज्यामध्ये विभागासाठी ६,४८१ आणि महाराष्ट्र जलसंधारण महामंडळासाठी दोन पदांचा समावेश आहे, ज्यामुळे एकूण ६,४८३ पदे म्हणजेच २,२८४ अतिरिक्त पदे निर्माण झाली आहेत.

## संपादकीय ......

# मिशन काटकसर

आखाती युद्धाची गुंतागुंत आणि येणार्या काळात निर्माण होणार्या समस्यांचा वेध घेऊन पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी नागरिकांना वर्षभरासाठी एक सप्तसूत्री पाळण्याचे आवाहन केले. सोने खरेदी टाळण्याचे, पेट्रोल-डिझेलचा वापर कमी करण्याचे आणि स्वदेशी वस्तूंना प्राधान्य देण्याचे आवाहन अधिकाधिक परकीय चलनाची बचत करण्याच्या उद्देशाने केले आहे. 'लोका सांगे ब-ह्मज्ञान, स्वतः कोरडे पाषाण' असे न करता स्वतः पंतप्रधानांनी आणि राष्ट्रीय लोकशाही आघाडीमधील नेतेगणांनी तत्काळ इंधनात बचतीसाठी आपला लांबलचक वाहनांचा ताफा कमी केला. 'चॅरिटी बिगिन्स फ्रॉम होम' या उक्तीनुसार राष्ट्रहित सर्वतोपरी मानत विविध नेतेमंडळींनी काटकसरीचा मार्ग अनुसरण्यास सुरुवात केली.

पंतप्रधानांच्या ताफ्यात १२ ते १५ गाड्या असतात. पण पंतप्रधान मोदी आता फक्त दोन गाड्यांसह बाहेर पडतात. केंद्रीय मंत्र्यांनीही त्यांच्या ताफ्यातील गाड्या कमी केल्या. मध्य प्रदेशचे ऊर्जामंत्री प्रद्युम्न सिंह तोमर भोपाळमधील सरकारी निवासस्थानाहून ई-स्कूटरने पंचानन भवनात पोहोचले; तर मध्य प्रदेश उच्च न्यायालयाचे न्यायमूर्ती डी. डी. बन्सल तीन किलोमीटर सायकल चालवून न्यायालयात आले. उत्तर प्रदेशासारख्या काही राज्यांनी व्हर्च्युअल बैठकांना प्राधान्य देण्याचा निर्णय घेतला आहे. महाराष्ट्रात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सरकारी खर्चात कपात करण्याच्या दिशेने पावले उचलली असून प्रशासकीय गैरसोय टाळणे आणि अनावश्यक खर्च कमी करून राज्याच्या तिजोरीवरचा भार कमी करणे यासाठी 'मिशन काटकसर' ही मोहीमच राबवण्यास सुरुवात केली आहे. मंत्र्यांनी आणि आमदारांनीही आपापल्या पातळीवर मोठा खर्च टाळावा, अशा सूचना दिल्या आहेत.सरकारी पातळीवरील या बचतीच्या उपायांची दखल घेत येणार्या काळात हळूहळू का होईना, पण जनतेकडून निश्चितपणे याचे अनुसरण होण्यास मदत होईल. १९६० च्या दशकातही भारत अत्यंत कठीण काळातून जात होता. १९६२ च्या चीन युद्धानंतर देशाची आर्थिक स्थिती खालावली होती. त्यातच १९६५ मध्ये पाकिस्तानसोबत युद्ध सुरू झाले. याच काळात भीषण दुष्काळ पडल्यामुळे अन्नधान्याची तीव- टंचाई निर्माण झाली. भारत अन्नधान्यासाठी अमेरिकेवर अवलंबून होता. मात्र, पाकसोबतच्या युद्धामुळे अमेरिकेने भारतावर दबाव आणण्यासाठी अन्नपुरवठा थांबवण्याची धमकी दिली. देशाचा स्वाभिमान गहाण ठेवून अमेरिकेच्या अटी मान्य करण्याऐवजी शास्त्रीजींनी स्वयंपूर्णतेचा मार्ग निवडला. त्यांच्या कुटुंबाने एक वेळचे जेवण सोडले. त्यांनी भारतीयांना आठवड्यातून एक वेळ उपवास करावा, असे आवाहन केले. त्यांच्या एका हाकेवर संपूर्ण देशाने प्रतिसाद दिला.अनेक हॉटेलमालकांनी सोमवारी संध्याकाळी उपाहारगृहे बंद ठेवली होती. आज पुन्हा भारतासमोर तीच वेळ यावी ही खरे तर दुर्दैवाची बाब! त्यामागचे कारण पुन्हा अमेरिकाच असावे हा त्याहून मोठा दैवदुर्विलास! पण भारत आणि भारतीय लोक अशा संघर्षकाळात हिकमतीने मुकाबला करत आले आहेत. राष्ट्रहितासाठी नेतृत्वाने घेतलेल्या निर्णयाचे अनुसरण करणे, संकटकाळात खंबीरपणे त्याच्या पाठीशी उभे राहणे हा या देशाचा संस्कार आहे. पंतप्रधान मोदींचा उद्देश स्पष्ट आहे, तो म्हणजे आपण अर्थव्यवस्था इतकी मजबूत आणि आत्मनिर्भर बनवली पाहिजे की, जागतिक बाजारातील डॉलरच्या चढ-उतारांचा गरीब आणि मध्यमवर्गावर परिणाम होऊ नये. डॉलरचा वापर कमी केल्यास जागतिक धक्क्यांचा आपल्यावरील परिणाम कमी होईल. देशातील २० टक्के कार्यालयीन कर्मचारी घरून काम करू लागले, तर पेट्रोल आणि डिझेलचा वापर लक्षणीयरीत्या कमी होईल. विविध राज्यांमधील नेतृत्वांनीही आता पंतप्रधानांच्या सप्तसूत्रीबाबत जनतेमध्ये प्रबोधन सुरू केले आहे. प्रत्येकाने केलेली इंधनाची अत्यल्प बचतही शासनाच्या उद्दिष्टांना पूर्ततेकडे जाण्यास हातभार लावणारी ठरणार आहे.बंगळूर आणि मुंबईसारख्या शहरांमध्ये ३० किमीच्या दैनंदिन प्रवासासाठी वाहने वाहतूक कोंडीत अडकल्यामुळे दिवसाला सुमारे दोन ते २.५ लिटर अतिरिक्त इंधन जळते. यामुळे सामान्य नोकरदाराचा मासिक खर्च ५००० रुपयांपर्यंत वाढतो. वर्क फ्रॉम होम, कारपुलिंगसारख्या निर्णयांमुळे रस्त्यावर धावणार्या वाहनांची संख्या २० ते ३० टक्क्यांनी कमी झाल्यास त्याचे तिहेरी लाभ होणार आहेत. इंधनाची तर बचत होईलच; पण वाहतूक कोंडीमुळे अतिरिक्त जळणार्या अब्जावधी रुपयांच्या इंधनाची बचत होईल. पर्यावरणासाठी होणारे याचे लाभ त्याहून अधिक आहेत. सरकारने संसदेत मांडलेल्या आर्थिक सर्वेक्षणात सर्वाधिक गर्दीच्या शहरांमध्ये 'कन्जेशन प्राइसिंग' लागू करण्याची शिफारस केली आहे. यामुळे गर्दीच्या वेळी रस्त्यावर येणार्या खासगी वाहनांच्या संख्येत घट होऊन इंधन बचत होण्यास मदत होईल. अनेकांनी विदेश दौरे, विवाह समारंभांसाठीची सोनेखरेदी यांना लगाम घालण्यास सुरुवात केली आहे. सामूहिक सहभाग जितका वाढत जाईल तितकी ही लढाई सुकर होत जाईल. भारताची लोकसंख्या १४० कोटींहून अधिक आहे.यातील ४० ते ५० टक्के वर्गाने जरी याबाबत काटेकोरपणा आणि सक्रियता अमलात आणली तरी वर्षभरासाठीचा पंतप्रधानांनी व्यक्त केलेला अंदाजित कालावधी सात-आठ महिन्यांपर्यंत कमी होऊ शकतो. आजचे संकट बदलत्या जागतिक परिस्थितीचा परिपाक आहे. ती परिस्थिती बदलणे भारताच्या हाती नाही. त्यामुळे आपण हाती असलेल्या पर्यायांचा प्रभावीपणे वापर करून या संकटाच्या झळा कमी करू शकतो. कोरोना संकटकाळात भारतीय अर्थव्यवस्था तग धरू शकली आणि त्यानंतर तिने फिनिक्स भरारी घेतली. आजचा संधिकाळ सरल्यानंतर त्याहून मोठी भरारी भारत घेईल, याबाबत शंका बाळगण्याचे कारण नाही. आताही अनेक कंपन्यांचे तिमाही निकाल भरीव वृद्धी दर्शवणारे आहेत. आखातातील तिढा पूर्ण सुटल्यानंतर आणि अमेरिकेसोबतचा व्यापार पूर्ववत झाल्यानंतर देशाची अर्थव्यवस्था पुन्हा सुसाट वेगाने धावेल. तोवर हे मिशन काटकसर सहमतीने, सामूहिक सहकार्याने राबवण्याचा संकल्प सर्वांनी करायला हवा.

# पंतप्रधान मोदींच्या आवाहनाने महाराष्ट्रातील जावई आले धोक्यात!

## कारण वाचून तुम्ही थक्क व्हाल

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१५अमरावती**

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी काटकसरीने जगण्याचा सल्ला देशवासीयांना दिला आहे. यामुळे मात्र जावयांवर नवीन संकट निर्माण झाले आहे. सध्या सगळीकडे चर्चा आहे ती म्हणजे धोंड्याच्या महिन्याची, अर्थात अधिक मासाची. हिंदू पंचांगानुसार दर तीन वर्षांनी येणारा हा महिना म्हणजे जावयांसाठी सोनियाचा दिवस आणि सासरच्या मंडळींसाठी खिशाला कात्री लावणारा काळ असतो. मात्र, यंदा या परंपरेला सोन्याच्या भावापेक्षाही पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या सोनेखरेदी न करण्याच्या वाढत्या आवाहनाने वेगळ्याच चिंतेची जोड मिळाली आहे. या विषयावरील मीम्स सध्या चर्चेत आहेत.

**अधिक मासाचे महत्व काय ?**

सौर वर्ष आणि चांद्र वर्ष यांची सांगड घालण्यासाठी दर तीन वर्षांनी जो अतिरिक्त महिना येतो, त्याला अधिक मास म्हणतात. भगवान विष्णूच्या या लाडक्या महिन्यात जावयाला साक्षात विष्णू मानून पुजण्याची पद्धत आहे. परंपरेनुसार, जावयाला ३३ अनारसे, सोन्याचे भांडे किंवा सोन्याची अंगठी देण्याची पद्धत आहे. ज्यांना सोने परवडत नाही, ते तांबे किंवा पितळेच्या भांड्यात सोन्याची तार लावून काम भागवतात. येत्या १७ मेपासून धोंड्याचा महिना सुरू होणार आहे. अशात पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी, 'देशाच्या आर्थिक हितासाठी सोन्याची खरेदी टाळा', असे आवाहन केले आहे. या आवाहनाने जावईबापूंचे बीपी वाढलेले आहे.




### सोन्याच्या अंगठ्यांचे रूपांतर चांदीमध्ये

यंदाच्या अधिक मासात सासरकडून मिळणाऱ्या सोन्याच्या अंगठ्यांचे रूपांतर चांदीच्या तबकात किंवा स्टीलच्या डब्यात तर होणार नाही ना, या भीतीने अनेक जावई सध्या चिंतेत आहेत. काही अतिउत्साही जावयांनी तर आतापासूनच आपल्या सासूबाईंना 'पंतप्रधानांचे आवाहन फक्त गुंतवणुकीसाठी आहे, प्रेमाच्या भेटीसाठी नाही', असे मेसेज पाठवल्याचे मीम्सदेखील सध्या जोरात व्हायरल होत आहेत.

# पावसाळ्यापूर्वी सर्व पेंडींग कामे पूर्ण करा आ. रवि राणांची अधिकाऱ्यांना ताकिद

## विद्युत भवनात महावितरण अधिकाऱ्यांसोबत बैठक ..

### कामचुकारपणा खपवून घेतला जाणार नाही

**विदर्भ प्रजासत्ताकदि.१५अमरावती**
अध्यक्ष विधानसभा आश्वासन समिती व आमदार रवी राणा यांच्या अध्यक्षतेखाली अमरावती शहर व ग्रामीण विभागातील विविध प्रलंबित समस्या, विद्युत पुरवठा तसेच शेतकरी हिताच्या कामांचा आढावा घेण्यासाठी विद्युत भवन येथील जिल्हा कार्यालयात महत्त्वपूर्ण बैठक पार पडली. बैठकीत पावसाळ्यापूर्वी सर्व प्रलंबित कामे तातडीने पूर्ण करण्याच्या निर्णय घेऊन ती तातडीने करण्याच्या सूचना उपस्थित अधिकाऱ्यांना देण्यात आल्या. बैठकीदरम्यान उपस्थित उप महापौर व नगरसेवांच्या समस्या ऐकून घेऊन शहर व ग्रामीण भागातील नागरिकांना भेडसावणाऱ्या समस्या, मानवी वस्त्यांमधील धोकादायक विद्युत तारा त्वरित दुरुस्त करणे, शेतकऱ्यांच्या कृषी पंपांना नियमित वीजपुरवठा देणे तसेच विविध विकासकामेवेगाने पूर्ण करण्याबाबत चर्चा करण्यात आली. यावेळी अधिकाऱ्यांना आमदार रवी राणा यांनी कडक शब्दांत शेवटची ताकीद देत, बैठकीत घेतलेले निर्णय वेळेत पूर्ण करा, अन्यथा कामचुकारपणा खपवून घेतला जाणार नाही, असा इशारा दिला. बैठकीत मनपा परिसर व अमरावती, भातकुली, अचलपूर, तिवसा, दर्यापूर, चिखलदर, धारणी, मोर्शी, आदी तालुक्यांतील विविधप्रलंबित कामांचा सविस्तर आढावा घेण्यात आला. सौर ऊर्जा कृषी पंप योजना, नवीन रोहित्र बसविणे, विद्युत वाहिन्या टाकणे, मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी योजना, प्रधानमंत्री मुक्त बिजली योजना तसेच पीएसपी अंतर्गत मंजूर कामे तातडीने पूर्ण करण्याच्या सूचना अध्यक्ष रवी राणा यांच्याकडून देण्यात आल्या.



याशिवाय उपकेंद्र उभारणी करणे आदी कामे, जिल्हा वार्षिक योजनेअंतर्गत मंजूर विकासकामे तसेच शहर व ग्रामीण भागातील विद्युत पुरवठा सुरळीत करण्यावर विशेष भर देण्यात आला. सब डिव्हिजनचे विभाजनमनु बळ परे मान्यता देण्यासाठी बैठकीतून आ. रवी राणा यांनी सचिन तालेवार संचालक प्रोजेक्ट, ऑपरेशन यांच्या सोबत बोलल मान्यता करण्याबाबतही बैठकीत चर्चा झाली असून, यासाठी लवकरच शासन स्तरावर मान्यता मिळणार असल्याची माहिती आमदार रवी राणा यांचे कडून देण्यात आली.

# झोन सभापतींचा पदग्रहण सोहळा टीकेचे लक्ष्य



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१५अमरावती**

महापालिकेच्या मध्य झोन क्रमांक दोन राजापेठच्या झोन सभापती स्वाती कुलकर्णी यांच्या पदग्रहणाचा भव्य व उत्साहपूर्ण समारंभ गुरुवारी पार पडला. यावेळी करण्यात आलेली व्यवस्था टीकेचे लक्ष्य ठरली असून, विरोधकांना आयते कोलित सापडले. तथापि हा खर्च सभापतींनी स्वतः केला असून, मनपावर त्याचा ताण पडला नसल्याचे सांगण्यात आले. कार्यक्रमाला महापौर श्रीचंद तेजवानी, स्थायी समिती सभापती अविनाश मार्डीकर, सभागृह नेता चेतन गावंडे, झोन एकच्या सभापती माधुरी ठाकरे, शहर सुधार समिती सभापती राधा कुरील, शिक्षण समिती सभापती प्रीती रेवणे, विधी समिती उपसभापती मधुरा काहाळे, नगरसेविका लविणा हर्षे, पद्मजा कौंडण्य, नंदा सावदे, डॉ. स्मिता सूर्यवंशी, नगरसेवक मिलिंद बांबल, महेश मुलचंदानी, डॉ. संजय तीरथकर, माजी नगरसेवक तुषार भारतीय, माजी नगरसेविका संगीता बुरंगे, सहायक आयुक्त भूषण पुसतकर, मंगेश कडू, राजू कुरील, मिलिंद काहाळे, मनपा कर्मचारी, विविध सामाजिक संस्थांचे पदाधिकारी व नागरिक उपस्थित होते. पदग्रहण सोहळ्यासाठी करण्यात आलेली व्यवस्था व नियोजन टीकेचे लक्ष्य ठरले. झोन कार्यालयाच्या इमारतीपासून दालनापर्यंत विविधरंगी बलूनच्या माळा, महागडा नास्ता, हारतुरे, शासकीय वाहनांची संख्या, असा सर्व तामझाम करण्यात आल्याने प्रधानमंत्री व मुख्यमंत्र्यांनी केलेल्या काटकसरीच्या सल्ल्याचे व आवाहनांचा विसर पडल्याची टीका होत आहे.

# शासकीय मेडिकल कॉलेज धोक्यात..तर पुढच्या वर्षी विद्यार्थ्यांचे प्रवेशच होणार नाहीत : डॉ. सुनील देशमुख

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१५अमरावती** दोन वर्षांपूर्वी अस्तित्वात आलेले अमरावती शासकीय वैद्यकीय महाविद्यालय धोक्यात आलेले आहे. महाविद्यालयाची एकूण स्थिती बघता पुढील वर्षी प्रवेशच देऊ नका, असे पत्र महाराष्ट्र युनिव्हर्सिटी हेल्थ सायन्स विभागाने अधिष्ठात्यांना दिल्याचा गौप्यस्फोट माजी मंत्री डॉ. सुनील देशमुख यांनी केला.

अमरावती येथे शासकीय वैद्यकीय महाविद्यालय स्थापन होऊन दोन वर्षाचा कालावधी उलटला आहे. परंतु महाविद्यालय स्थापन करण्याच्या आदेशाची पूर्णतः अंमलबजावणी अद्यापही झालेली नाही. वैद्यकीय महाविद्यालयाच्या अधिष्ठात्यांना येथील जिल्हा सामान्य रुग्णालय, जिल्हा स्त्री रुग्णालय अद्यापही हस्तांतरीत करण्यात आलेले नाही. विद्यार्थ्यांना शिकविण्यासाठी प्राध्यापक नाहीत, वर्ग खोल्या नाहीत. वैद्यकीय महाविद्यालयासाठी आवश्यक कुठल्याही पायाभूत सुविधा अद्यापही उपलब्ध करून देण्यात आलेल्या नाहीत. विद्यार्थ्यांना शिकण्यासाठी रुग्णालय, ऑपरेशन थिएटर याची गरज असते. ही स्थिती लक्षात घेता एमयूएचएसने उपरोक्त पत्र महाविद्यालयाच्या अधिष्ठात्यांना दिल्याचे डॉ. सुनील देशमुख यांनी येथील सांगितले.



अमरावती शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाच्या जागेचा मुद्दा हा पूर्णतः वेगळा मुद्दा आहे. येथील लोकप्रतिनिधी फक्त जमीन, जमीन, जमीन करीत आहेत. मात्र खऱ्या अर्थाने वैद्यकीय महाविद्यालयच धोक्यात आलेले आहे.

अशीच स्थिती राहिल्यास अंतिम वर्षाच्या विद्यार्थ्यांना पासआऊट करणे शक्य होणार नाही आणि पुढील वर्षी विद्यार्थ्यांचे प्रवेशच झाले नाही तर शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाच बंद पडू शकते. लोकप्रतिनिधींचे याकडे अजिबात लक्ष नाही, असेही डॉ. सुनील देशमुख म्हणाले.

# राज्याच्या आवास योजनेत अमरावतीची दुहेरी बाजी

## राज्य पुरस्कृत आवास योजनेत विभाग, जिल्हास्तरावर द्वितीय

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१५अमरावती**

महाराष्ट्र शासन ग्राम विकास विभाग अंतर्गत राबविण्यात आलेल्या महा आवास अभियान २०२३-२४ अंतर्गत राज्यस्तरीय पुरस्कार जाहीर करण्यात आले आहे. अमरावती विभागाने विभागीय स्तरावर द्वितीय क्रमांक प्राप्त केला आहे. तसेच सर्वोत्कृष्ट जिल्हा या श्रेणीत जिल्हा परिषद अमरावतीला राज्य पुरस्कृत आवास योजनेत द्वितीय क्रमांक मिळाल्याने जिल्ह्याच्या ग्रामीण गृहनिर्माण कार्याला राज्यस्तरावर गौरव प्राप्त झाला आहे.

विकास, कृषी व किसान कल्याणमंत्री यांच्या हस्ते व मुख्यमंत्री यांचेप्रमुख उपस्थितीत १५ मे रोजीसैनिक स्कूल सातारा येथे लाभार्थीमेळावा व महाआवास अभियानपुरस्कार वितरण सोहळा आयोजितकरण्यात आला आहे. या सोहळ्यातराज्यभरातील उत्कृष्ट कामगिरीकरणाऱ्या विभाग, जिल्हे, तालुकेग्रामीण गृहनिर्माण कार्यालय महाराष्ट्र यांनी १२ मे रोजी प्रसिद्ध केलेल्या पत्रानुसार केंद्रीय ग्रामीण आणि ग्रामपंचायतींचा गौरव करण्यातयेणार आहे. राज्य पुरस्कृत आवास योजना श्रेणीत विभागस्तरावर प्रथम क्रमांक नागपूर विभागाला, तर द्वितीय क्रमांक अमरावती विभागाला जाहीर झाला आहे. याशिवाय जिल्हास्तरावर प्रथम नांदेड जिल्ह्यास, तर द्वितीय क्रमांक जिल्हा परिषद अमरावतीला प्राप्त झाला आहे. ही कामगिरी जिल्ह्यातील आवास योजनांच्या प्रभावी अंमलबजावणीची पोच पावतीमानली जात आहे. प्रकल्प संचालक प्रीती देशमुख, तालुक्यातील सर्व गट विकास अधिकारी तसेच सर्व संबंधित अधिकारी कर्मचाऱ्यांनी, लाभार्थी निवड, घरकुल मंजुरी, बांधकाम प्रगती आणि प्रलंबित प्रकरणे निकाली काढण्यावर सातत्याने भर दिला. त्यातूनच अमरावती जिल्ह्याने राज्यात आपले स्थान मजबूत केले आहे. अमरावती विभाग व जिल्हा परिषदेला मिळालेल्या या दुहेरी यशामुळे ग्रामीण विकास क्षेत्रात जिल्ह्याचा नावलौकिक वाढला असून, राज्यस्तरीय पुरस्कार वितरण सोहळ्यात विभागीय आयुक्त कार्यालय आणि जिल्हा परिषद अमरावतीचा गौरव करण्यात येणार आहे.




राज्यस्तरावर मिळालेला हा सन्मान जिल्हा परिषदच्या सर्व यंत्रणेच्या एकत्रित परिश्रमांचे फलित आहे. लाभार्थी-केंद्रित नियोजन आणि वेळेत अंमलबजावणी यावर भर दिल्यामुळे हे यश शक्य झाले.
**सत्यम गांधी, सीईओ.**

# पाणी प्रश्न मिटला ... मजीप्रा कंत्राटदारांचे आंदोलन मागे

## आमदार संजय खोडके यांच्या मध्यस्थीने प्रश्न सुटला




**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१५अमरावती** महाराष्ट्र जीवन प्राधिकरणातील (मजीप्रा) कंत्राटदारांनी गेल्या तीन दिवसांपासून सुरू केलेले काम बंद आंदोलन गुरुवारी सायंकाळी मागे घेतले. आमदार संजय खोडके यांच्या यशस्वी मध्यस्थीमुळे हे आंदोलन थांबले असून, अमरावती शहरातील संभाव्य पाणीसंकट टळले आहे. आमदार खोडके यांनी कंत्राटदारांना त्यांच्या प्रलंबित रकमा मिळवून देण्यासाठी प्रयत्नशील असल्याचे सांगितले. त्यांनी वरिष्ठांशी चर्चा केली असून, येत्या आठवडाभरात कंत्राटदारांना त्यांची देयके मिळतील, असे आश्वासन दिले. या आश्वासनानंतर कंत्राटदारांनी आंदोलन मागे घेण्याचा निर्णय घेतला.

आंदोलन मागे घेतल्यानंतर पंप हाऊसवरील कर्मचारी तसेच शहराच्या विविध भागांत पाणी सोडणारे व्हॉल्वमॅन शुक्रवारपासून त्यांचे कामकाज नियमितपणे पार पाडणार आहेत. यामुळे शहरातील पाणीपुरवठा पूर्ववत होण्यास मदत होईल.

अमरावती येथील कंत्राटदारांना मजीप्राकडून सुमारे १५ कोटी रुपये येणे बाकी आहेत. गेल्या अनेक महिन्यांपासून ही रक्कम न मिळाल्याने कंत्राटदारांपुढे गंभीर आर्थिक संकट उभे राहिले होते. आंदोलनकर्त्यांचे नेते धनंजय बंड आणि त्यांच्या सहकाऱ्यांनी चर्चेदरम्यान हा मुद्दा आमदार खोडके यांच्या निर्दर्शनास आणून दिला.

कंत्राटदारांनी काम बंद आंदोलन पुकारल्यामुळे गुरुवारी शहराच्या काही भागांत पाणी पोहोचले नाही. सिंभोरा येथील पंपहाऊसचे ऑपरेटर आणि शहरात पाणी सोडणारे व्हॉल्वमॅन कामावर नसल्याने पाणीपुरवठ्यावर परिणाम झाला होता.

दरम्यान, मजीप्राचे मुख्य अभियंता साळुंके आणि उपविभागीय अभियंता संजय लेवरकर हे गेल्या दोन दिवसांपासून याच प्रश्नावर तोडगा काढण्यासाठी मुंबईत तळ ठोकून होते.

# सुकळी येथील घनकचरा व्यवस्थापन प्रकल्पाची पाहणी

## स्रोतस्तरावरील कचरा विलगीकरणावर भर; RDF निर्मिती, बायोमायनिंग व वैज्ञानिक लँडफिल प्रक्रियेचा घेतला आढावा

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१५अमरावती**

शहरातील घनकचरा व्यवस्थापन अधिक प्रभावी, पर्यावरणपूरक आणि वैज्ञानिक पद्धतीने राबविण्याच्या दृष्टीने महापौर श्रीचंद तेजवानी, महानगरपालिका आयुक्त वर्षा लड्डा, उपमहापौर सचिन भेंडे, स्थायी समिती सभापती अविनाश मार्डीकर, सभागृह नेता चेतन गावंडे, अतिरिक्त आयुक्त शिल्पा नाईक यांनी सुकळी येथील घनकचरा व्यवस्थापन (चडथ) प्रकल्पाला भेट देऊन विविध विभागांची सखोल पाहणी केली.या भेटीदरम्यान मान्यवरांनी प्रकल्पाच्या एकूण कार्यपद्धतीचा आढावा घेत शहरातून दररोज संकलित होणाऱ्या कचऱ्याच्या व्यवस्थापनाबाबत अधिकाऱ्यांकडून माहिती जाणून घेतली. सध्या प्रकल्पाची २५० मेट्रिक टन कचरा प्रक्रिया करण्याची क्षमता असून, शहरातून येणाऱ्या कचऱ्याचे शास्त्रोक्त पद्धतीने वर्गीकरण आणि विलगीकरण केले जात असल्याची माहिती यावेळी देण्यात आली.प्रकल्पामध्ये ओला कचरा, सुकळी कचरा,आणि इनर्ट अशा विविध प्रकारांमध्ये कचऱ्याचे





विभाजन करण्यात येते. यामध्ये विशेषतः ओल्या कचऱ्यावर प्रक्रिया करून त्याचे व्यवस्थापन केले जाते, तर ज्वलनशील स्वरूपातील कचऱ्यापासून ठऊ्ऱ तयार करण्यात येते. हा ठऊ्ऱ दररोज सुमारे १०० मेट्रिक टन प्रमाणात चंद्रपूर येथे पाठविण्यात येत असल्याची माहिती अधिकाऱ्यांनी दिली. इतर शहरांच्या तुलनेत हे प्रमाण लक्षणीय मोठे असल्याचेही त्यांनी नमूद केले.भेटीदरम्यान मान्यवरांनी प्लांटमध्ये उपलब्ध विविध यंत्रसामग्रीची कार्यपद्धती प्रत्यक्ष पाहिली. कचरा वर्गीकरणासाठी वापरण्यात येणाऱ्या मशिनरी, कन्वेयर सिस्टीम, विलगीकरण प्रक्रिया तसेच ठऊ्ऱ निर्मितीची संपूर्ण कार्यपद्धती याबाबत अधिकाऱ्यांनी सविस्तर माहिती दिली. प्लांटमध्ये सध्या उपलब्ध ठऊ्ऱ साठा, चंद्रपूरला पाठविण्यात आलेल्या ठऊ्ऱ चे प्रमाण आणि भविष्यातील व्यवस्थापनाबाबतही चर्चा करण्यात आली.यावेळी मान्यवरांनी स्रोतस्तरावरील कचरा विलगीकरण या उपक्रमाला अधिक गती देण्याच्या सूचना केल्या. नागरिकांनी घरातूनच ओला आणि सुका कचरा वेगळा करून दिल्यास संपूर्ण प्रक्रिया अधिक सुलभ, जलद आणि पर्यावरणपूरक होईल, असे मत त्यांनी व्यक्त केले. शहरातील नागरिकांमध्ये कचरा वर्गीकरणा बाबत अधिक जनजागृती करण्या ची आवश्यकता असल्याचे ही यावेळी सांगण्यात आले.तसेच सुकळी प्रकल्प परिसरातील प्राणी अवशेष जाळणी प्रकलप याचीही पाहणी करण्यात आली. प्राण्यांचे अवशेष वैज्ञानिक पद्धतीने विल्हेवाट लावण्यासाठी उभारण्यात आलेल्या या प्रकल्पाच्या कार्यपद्धतीची माहिती अधिकाऱ्यां नी दिली. यामुळे पर्यावरणीय प्रदूषण कमी होण्यास मदत होत असल्याचे सांगण्यात आले.या पाहणी दरम्यान शहर सुधार समिती सभापती सौ.राधा कुरील, नगरसेवक ॲड.प्रशांत देशपांडे, राजु कुरील, उपायुक्त योगेश पिठे, शहर अभियंता रविंद्र पवार, वैद्यकीय अधिकारी (स्वच्छता) डॉ.अजय जाधव, सहाय्यक आयुक्त भुषण पुसतकर, पशुशल्य चिकीत्सक डॉ.सचिन बोंद्रे, उपअभियंता विवेक देशमुख, अभियंता राजेश आगरकर, शरद तिनखेडे, मनपा कर्मचारी, कंत्राटदार उपस्थित होते.

# तळेगाव फाटा येथे भीषण अपघात; दांपत्य गंभीर जखमी

## चिमुकली बालिका थोडक्यात बचावली

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१५तळेगाव ठाकूर**

: राष्ट्रीय महामार्गावरील तळेगाव फाटा परिसरात गुरुवारी सायंकाळी सुमारे ५.३० वाजताच्या सुमारास भीषण अपघात घडला. नागपूरकडून अमरावतीच्या दिशेने भरधाव येणाऱ्या कारने दुचाकीला जोरदार धडक दिल्याने दुचाकीवरील दांपत्य गंभीर जखमी झाले. या अपघातामुळे काही काळ राष्ट्रीय महामार्गावर तणावपूर्ण वातावरण निर्माण झाले होते.

मिळालेल्या माहितीनुसार, कल्याणी पवन शेवाने (वय २६ वर्षे) व पवन अशोक शेवाने (वय ३८ वर्षे, रा. कापूस तळणी) हे तिवसा येथे लग्न समारंभ आटोपून तळेगाव ठाकूर येथे नातेवाईकांच्या भेटीसाठी जात



होते. तळेगाव फाटा येथे रस्ता ओलांडत असताना नागपूरकडून भरधाव येणाऱ्या कारने त्यांच्या एमएच २८ बीके ८७८९ क्रमांकाच्या दुचाकीला मागून जबरदस्त धडक दिली.

धडकेचा जोर इतका प्रचंड होता की दुचाकी काही अंतरावर फेकली गेली, तर दोघेही गंभीर जखमी होऊन रस्त्यावर कोसळले. अपघाताच्या वेळी दुचाकीवर त्यांच्यासोबत असलेली चार वर्षांची चिमुकली बालिका देखील काही अंतरावर फेकली गेली. मात्र, सुदैवाने तिला कोणतीही दुखापत झाली नाही.

अपघाताची माहिती मिळताच स्थानिक नागरिकांनी घटनास्थळी धाव घेत जखमींना तत्काळ उपचारासाठी हलवले. या घटनेमुळे परिसरात काही काळ तणावाचे वातावरण निर्माण झाले होते.

पुढील तपास तिवसा पोलीस यंत्रणांकडून सुरू आहे.

# केंद्रीय शिक्षणमंत्री धर्मेंद्र प्रधान यांच्यापोस्टरची जाळपोळ

## नीट परीक्षा पेपर फुटी प्रकरणी युवक काँग्रेस आक्रमक



**..विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१५अमरावती**

देशातील तरुणांचे भविष्य उद्धवस्त करणाऱ्या नीट पेपरफुटी प्रकरणाच्या निषेधार्थ अमरावती जिल्हाधिकारी कार्यालयासमोर युवक काँग्रेसतर्फे आंदोलन करण्यात आले. यावेळी केंद्रीय शिक्षणमंत्री धर्मेंद्र प्रधान यांनी तात्काळ राजीनामा अशी मागणी करत त्यांचा निषेध करण्यात आला आणि शिक्षण मंत्री धर्मेंद्र प्रधान यांच्या पोस्टरची जाळपोळ करण्यात आली..यावेळी भाजपा सरकारविरोधात जोरदार घोषणाबाजी केली.नीट परीक्षेचा पेपर फुटल्यामुळे देशभरातील २४ लाख विद्यार्थ्यांच शैक्षणिक आणि आर्थिक नुकसान झालं.या गंभीर प्रकाराची नैतिक जबाबदारी स्वीकारून केंद्रीय शिक्षणमंत्री धर्मेंद्र प्रधान यांनी तात्काळ राजीनामा द्यावा.तसेच विद्यार्थ्यांना नुकसानभरपाई देण्यात यावी अशी मागणी करण्यात आली

# गोपाल नगर अंडरपासची मनपा प्रशासनाकडून पाहणी

## पावसाळ्यापूर्वी काम पूर्ण करण्याचे निर्देश

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१५ अमरावती :**

आगामी पावसाळ्याच्या पार्श्वभूमीवर गोपाल नगर येथील अर्धवट अवस्थेतील अंडरपास पुलाची अमरावती महानगर पालिका प्रशासनाकडून प्रत्यक्ष पाहणी करण्यात आली. मनपा आयुक्त तसेच महापौरांच्या उपस्थितीत झालेल्या या पाहणीत शिवसेना नगरसेवक संजय गव्हाळे, संबंधित विभागाचे अधिकारी, अभियंते आणि स्थानिक पदाधिकारी सहभागी झाले होते.गोपाल नगर परिसरातील नागरिकांकडून अंडरपासच्या रखडलेल्या कामाबाबत सातत्याने तक्रारी करण्यात येत होत्या. विशेषतः पावसाळ्यात पुलाखाली पाणी साचणे, निकृष्ट दर्जाचे बांधकाम, अपुरी विद्युत व्यवस्था आणि वाहतुकीची गैरसोय या समस्यांकडे प्रशासनाचे लक्ष



वेधण्यात आले होते. त्यानंतर प्रशासनाने घटनास्थळी भेट देऊन परिस्थितीचा आढावा घेतला. पाहणीदरम्यान अंडरपास परिसरा तील ड्रेनेज व्यवस्था, रस्त्याचे नियोजन, विद्युत पुरवठा, सुरक्षेच्या उपाययोजना तसेच अपूर्ण बांधकामाची माहिती अधिकाऱ्यांकडून घेण्यात आली. संबंधित अधिकाऱ्यांना काम तातडीने पूर्ण करण्याचे निर्देश देण्यात आले. पावसाळ्यापूर्वी नागरिकांना कोणताही त्रास होऊ नये, यासाठी आवश्यक उपाययोजना त्वरित राबविण्याच्या सूचनाही देण्यात आल्या.यावेळी मनपा आयुक्त लड्डा मॅडम, महापौर तेजवानी, गटनेते चेतन गावंडे, शहर सुधार समिती सभापती राधाताई कुरील, नगरसेवक डॉ. राजेंद्र तायडे, मंगेश खोंडे, सुमतीताई ढोके, मनपा सिटी इंजिनिअर तसेच मनपा उपायुक्त महेश देशमुख उपस्थित होते. स्थानिक नागरिकांनीही आपल्या समस्या प्रशासनासमोर मांडल्या. नागरिकांच्या सुरक्षिततेला प्राधान्य देत कामाच्या गुणवत्ते बाबत कोणतीही तडजोड केली जाणार नसल्याचे प्रशासनाने स्पष्ट केले. गोपाल नगर अंडरपासचे काम लवकर पूर्ण करून परिसरातील वाहतूक सुरळीत करण्यासाठी तसेच पावसाळ्याती ल संभाव्य अडचणी टाळण्या साठी प्रशासन प्रयत्नशील असल्याचे यावेळी सांगण्यात आले.

# प्रभागातील मजुरांच्या थकीत पगारासाठी झोन क्रमांक एक च्या नगरसेवकाचे आंदोलन

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१५अमरावती**

शहरातील स्वच्छता कामासाठी गेल्या एक ते दीड महिन्यांपासून अत्यंत मेहनत घेणाऱ्या कामगारांना अद्याप पगार मिळालेला नसल्याने संतापाची लाट उसळली आहे. संबंधित कंत्राटदाराकडे वारंवार मागणी करूनही मजुरांच्या पगाराबाबत कोणतीही ठोस कार्यवाही करण्यात आलेली नाही. उलट कंत्राटदाराकडून उडवा-उडवीची उत्तरे देण्यात येत असून सामान्य मजुरांची फसवणूक होत असल्याचा



आरोप नगरसेवक चंदू खेडकर यांनी केला एवढ्यावरच ते थांबले नाहीत तर कंत्राटदारांच्या कार्यालयात मजुरांसोबत ठिया आंदोलनात सहभागी झालेत.

दररोज कष्ट करून आपल्या कुटुंबाचा उदरनिर्वाह करणाऱ्या या महापालिकेच्या कामगारांवर आर्थिक संकट ओढवले आहे. पगार न मिळाल्याने घरखर्च, मुलांचे शिक्षण, औषधोपचार आणि दैनंदिन गरजा भागविणे कठीण झाले असल्याची भावना कामगारांनी व्यक्त केली. आम्ही प्रामाणिकपणे काम करतो, मात्र आमच्या श्रमाचे पैसेच मिळत नसतील तर जगायचे कसे? असा सवालही आंदोलनकर्त्यांनी उपस्थित केला.याच पार्श्वभूमीवर संतप्त कामगारांनी झोन क्रमांक एक कार्यालयात बंद आंदोलन सुरू केले आहे. संबंधित कंत्राटदारावर तातडीने कारवाई करून थकीत पगार अदा करण्यात यावा, अन्यथा आंदोलन अधिक तीव्र करण्याचा इशारा कामगारांनी दिला आहे. या मजुरांच्या आंदोलनात नगरसेवक चंदू खेडकर सहभागी झाले होते.

# औषध विक्रेत्यांचा २० मे रोजी देशव्यापी बंद

## जिल्ह्यात औषध पुरवठा सुरळीत ठेवण्यासाठी प्रशासन सज्ज, नियंत्रण कक्ष स्थापन

**विदर्भ प्रजासत्ताकदि.१५अमरावती,**

अखिल भारतीय औषधी विक्रेता संघटनेच्या वतीने विविध प्रलंबित मागण्यांच्या निषेधार्थ बुधवार, दिनांक २० मे २०२६ रोजी एक दिवसीय देशव्यापी बंदची घोषणा करण्यात आली आहे. या बंदमध्ये देशातील ठोक व किरकोळ औषध विक्रेते सहभागी होणार असून, त्यांनी आपले व्यवहार बंद ठेवण्याचे आवाहन केले आहे. या पार्श्वभूमीवर अमरावती जिल्ह्यात नागरिकांना आवश्यक औषधांचा पुरवठा सुरळीत आणि अखंडपणे उपलब्ध व्हावा, यासाठी अन्न व औषध प्रशासन पूर्णपणे सज्ज झाले असल्याची माहिती अमरावतीचे सहाय्यक आयुक्त (औषधे) डॉ. अ. मा. माणिकराव यांनी दिली आहे.




मुंबई येथील सह आयुक्त (औषधे) तथा नियंत्रण प्राधिकारी यांच्या निर्देशानुसार, अमरावती जिल्ह्यातील सर्व औषध विक्रेते, रुग्णालयांशी संलग्न असलेली औषध दुकाने तसेच २४ तास सुरू असणाऱ्या औषध दुकानांशी प्रशासनाने तातडीने समन्वय साधला आहे. नागरिकांची गैरसोय होऊ नये म्हणून अत्यावश्यक औषधांचा पुरेसा साठा उपलब्ध ठेवण्याबाबत संबंधित दुकानांना सूचना देण्यात आल्या आहेत. प्रत्येक तालुका आणि गाव पातळीवर देखील आवश्यक औषध दुकाने सुरू राहतील, यादृष्टीने प्रशासन विशेष प्रयत्न करीत आहे.

या आणीबाणीच्या परिस्थितीत कायदा व सुव्यवस्था आणि आरोग्य सेवा विस्कळीत होऊ नये म्हणून जिल्हाधिकारी, पोलीस प्रशासन, जिल्हा शल्य चिकित्सक, जिल्हा आरोग्य अधिकारी, इंडियन मेडिकल असोसिएशन तसेच खाजगी व निमसरकारी रुग्णालयांच्या प्रशासनाशी संपर्क साधून आवश्यक ती सर्व खबरदारी घेतली जात आहे.

नागरिकांनी या बंदच्या काळात कोणत्याही प्रकारच्या अफवांवर विश्वास ठेवू नये, असे आवाहन अन्न व औषध प्रशासनाच्या वतीने करण्यात आले आहे. औषध पुरवठ्याबाबत नागरिकांना कोणतीही अडचण किंवा तातडीची गरज भासल्यास, अमरावती कार्यालयात विशेष नियंत्रण कक्ष स्थापन करण्यात आला आहे. नागरिक ०७२१-२६६५८९२ या दूरध्वनी क्रमांकावर किंवा jcamrawati2022 gmail.com `m B-मेलवर संपर्क साधू शकतात. आपत्कालीन परिस्थितीत नागरिकांना तातडीने औषधे उपलब्ध करून देण्यास प्रशासन पूर्ण मदत करेल, अशी ग्वाही डॉ. माणिकराव यांनी दिली आहे.

# जिल्हाधिकाऱ्यांकडून 'एल निनो'च्या पार्श्वभूमीवर आढावापाणी, चाराचे नियोजन करण्याचे निर्देश

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१५अमरावती** 'एल निनो'च्या प्रभावामुळे निर्माण होऊ शकणाऱ्या संभाव्य परिस्थितीचा सामना करण्यासाठी जिल्हा प्रशासनाने पावले उचलली आहेत. यासाठी जिल्हाधिकारी आशिष येरेकर यांनी दूरदृश्य प्रणालीद्वारे आढावा बैठक घेतली. या बैठकीत जिल्ह्यातील पाणी टंचाई, जलसंधारण, शेती आणि चाऱ्याच्या उपलब्धतेबाबत विविध विभागांकडून सद्यस्थिती जाणून घेत आगामी काळातील उपाययोजनांचे नियोजन करण्यात आले.

जिल्हाधिकारी कार्यालयातील बैठकीला प्रभारी निवासी उपजिल्हाधिकारी ज्ञानेश्वर घ्यार उपस्थित होते. 'एल निनो'मुळे पाणी प्रभावीत होणार आहे. त्यामुळे उपाययोजना म्हणून जलसंधारणाच्या कामावर भर देण्यात येणार आहे. यावेळी जिल्हा जलसंधारण अधिकारी यांनी जिल्ह्यातील पाण्याच्या सद्यस्थितीची माहिती दिली.

जिल्हाधिकारी यांनी जलयुक्त शिवार अभियानाची सद्यस्थिती, तलाव आणि नाल्यांमधील गाळ काढणे, कालवा दुरुस्ती, चेक डॅमची कामे आणि नाला खोलीकरणाच्या कामांना प्राधान्य देण्याचे निर्देश दिले. तसेच सर्व जलसंधारण कामांचे मॅपिंग करण्याच्या सूचना दिल्या.

ग्रामीण व शहरी भागातील पिण्याच्या पाण्याच्या टंचाई लक्षात घेऊन पाणी पुरवठा करणाऱ्या यंत्रणांनी नियोजन करावे. ग्रामीण भागात टंचाईवर मात करण्यासाठी सार्वजनिक बोअरवेलवर सोलर पंप बसवण्याच्या कामाला गती देण्याच्या सूचना करण्यात आल्या. जिल्ह्यातील जलाशयांमधील उपलब्ध पाणी पिण्यासाठी प्राधान्याने उपयोगात आणावे. शहरी भागात नळजोडणीची तपासणी करून पाणीगळती तात्काळ दुरूस्त करण्यात यावी. याबाबत महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाला कळविण्यात यावे, अशा सूचना दिल्या.

सिंचनासाठी पाण्याचा वापर करताना सूक्ष्म नियोजन करावे. कालवा दुरुस्तीची कामे वेळेत पूर्ण करण्यात यावेत. कृषी विभागाने शेतीसाठी पाण्याचे नियोजन करावे. पीक विम्याची सद्यस्थिती आणि शेततळ्यांच्या कामांचे योग्य नियोजन करण्याचे निर्देश जिल्हा अधीक्षक कृषी अधिकाऱ्यांना देण्यात आले आहेत. जिल्ह्यातील पशुधनासाठी चाऱ्याची कमतरता भासू नये, यासाठी चाऱ्याची सद्यस्थिती तपासून आवश्यक ते नियोजन करण्याच्या सूचना देण्यात आल्या. याबाबत पशूसंवर्धन विभागाने जुलैपर्यंत चाऱ्याचे नियोजन करण्यात आले आहे. पुरेसा चारा उपलब्ध होणार आहे. तसेच शासकीय जमिनीवर चारा लागवडीचा कार्यक्रम हाती घेण्यात येणार असल्याचे सांगितले.

जलसंधारणाच्या कामातून भूजल पातळी वाढविण्यासाठी उपाययोजना करण्यात याव्यात.



प्रामुख्याने रिचार्ज शाफ्टच्या कामाचे नियोजन करावे. तसेच नवीन बोअरवेलच्या कामांवर नियंत्रण ठेवण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. रोजगार हमी योजनेतून 'गाव तिथे जलसंधारण कामे' राबवली जाणार आहेत. यात प्रामुख्याने शेततळे, पाझर तलाव, नाला खोलीकरण आणि गाळ काढणे, तसेच बोअरवेल आणि विहीर पुनर्भरणाची कामे हाती घेण्यात यावी. वन विभागानेही पाणी साठविण्यासाठी जागा निवडून कामे सुरू करावीत, असे निर्देश देण्यात आले.

# वधू-वरांसह राजकीय नेत्यांमध्येही 'रिल्स'ची 'क्रेझ'

## ग्रामीण भागातील तरुणांची छंदातून रोजगाराकडे वाटचाल; आकर्षक मांडणीची भुरळ

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१५अमरावती**

सध्याच्या डिजिटल आणि इंटरनेटच्या जगात स्मार्टफोन आणि सोशल मीडियाच्या वाढत्या वापरामुळे आता 'रिल्स' तयार करणे हा केवळ छंद राहिलेला नाही. तरुणांसाठी तो व्यवसायाचा एक मोठा स्रोत ठरत आहे. काही सेकंदांच्या व्हिडिओमधून स्वतःची ओळख, व्यवसाय, कार्यक्रम किंवा जीवनशैली आकर्षक पद्धतीने मांडण्याची स्पर्धाच सुरू झाली आहे. अमरावती शहरासह ग्रामीण भागातील राजकीय नेते, वधू-वर, व्यापारी, सामाजिक कार्यक्रम आणि तरुणांमध्ये रिल्स बनविण्याची मोठी क्रेझ निर्माण झाली असून अनेकांना या माध्यमातून रोजगार उपलब्ध होत आहे.

पूर्वी छायाचित्रे आणि साधे व्हिडिओ इतक्यापुरते मर्यादित असलेले कार्यक्रम आता सिनेमॅटिक रिल्स, ड्रोन शूट, स्लो मोशन व्हिडिओ, ट्रेंडिंग गाण्यांवरील एडिटिंग आणि आकर्षक ट्रान्झिशनपर्यंत पोहोचले आहेत. वाढदिवस, साखरपुडा, विवाह, उद्घाटन, राजकीय सभा, मेळावे, धार्मिक कार्यक्रम यामध्ये रिल्सचे विशेष महत्त्व वाढले आहे. एक चांगली



रिल काही हजार लोकांपर्यंत पोहोचते आणि त्यातून व्यवसाय वाढीस मदत होते, असे व्यावसायिकांचे मत आहे. कमी खर्चात मोठ्या प्रमाणात प्रसिद्धी मिळत असल्याने रिल्स हे प्रभावी मार्केटिंग माध्यम ठरत आहे. तालुक्यातील अनेक राजकीय नेते आता जनसंपर्कासाठी सोशल मीडियाचा मोठ्या प्रमाणात वापर करीत आहेत. सभा, दौरे, नागरिकांशी संवाद, विकासकामे किंवा वाढदिवसीय कार्यक्रम यांचे आकर्षक रिल्स तयार करून फेसबुक, इन्स्टाग्राम आणि व्हॉट्सअॅप स्टेटसवर टाकले जात आहेत. विशेष म्हणजे निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर तरुण मतदारांपर्यंत पोहोचण्यासाठी रिल्स हे प्रभावी माध्यम ठरत आहे. गाण्यांच्या पार्श्वभूमीवर नेत्यांचे स्लो मोशन व्हिडिओ, ड्रोनमधून घेतलेले दृश्य आणि घोषणाबाजी असलेले व्हिडिओ मोठ्या प्रमाणात व्हायरल होत आहेत. लग्नसमारंभांमध्येही रिल्सची क्रेझ मोठ्या प्रमाणात वाढली आहे. प्री-वेडिंग शूटपासून हळद, साखरपुडा, रिसेप्शनपर्यंत प्रत्येक कार्यक्रमाचे सिनेमॅटिक रिल्स बनविले जात आहेत. वधू-वर ट्रेंडिंग गाण्यांवर वेगवेगळ्या लोकेशनवर शूट करताना दिसत आहेत. काही कुटुंबे तर लग्नातील खास क्षणांचे स्वतंत्र रिल्स शूटसाठी बजेट ठेवत आहेत. गावातील अनेक व्यापारी आणि व्यावसायिकही

### रिल्स वापराचे धोके

रिल्सच्या वाढत्या ट्रेंडसोबत काही नकारात्मक बाबीही समोर येत आहेत. काही जण धोकादायक ठिकाणी स्टंट करून रिल्स तयार करीत असल्याने अपघाताची शक्यता वाढत आहे. अनेकजण रिल्स व सेल्फीच्या नादात जीव गमावून बसल्याचे दिसून येते. काहीजण केवळ प्रसिद्धीसाठी अतिशोक्तीपूर्ण किंवा दिखाऊ व्हिडिओ तयार करीत असल्याची चर्चा आहे. या पार्श्वभूमीवर मर्यादा आणि सुरक्षिततेची काळजी घेऊन रिल्स तयार करणे आवश्यक असल्याचे मत सुजाण नागरिक व्यक्त करत आहेत.

आपल्या व्यवसायाच्या जाहिरातींसाठी रिल्सचा आधार घेत आहेत. कपड्यांची दुकाने, हॉटेल्स, ज्वेलर्स, ब्युटी पार्लर, मोबाईल दुकाने, फर्निचर आणि इलेक्ट्रॉनिक्स व्यावसायिक रिल्सद्वारे ग्राहकांना आकर्षित करीत आहेत. रिल्स बनविणे, व्हिडिओ शूटिंग, एडिटिंग, ड्रोन ऑपरेटिंग आणि सोशल मीडिया व्यवस्थापन यामध्ये कौशल्य असलेल्या युवकांना मोठ्या प्रमाणात काम मिळू लागले आहे. मोबाईलवर आकर्षक एडिटिंग करणारे तरुण आता विवाह सोहळे, राजकीय कार्यक्रम, वाढदिवस आणि जाहिरातींचे शूट करून महिन्याला चांगले उत्पन्न मिळवत आहेत. ग्रामीण भागातील अनेक तरुणांसाठी हे नवे करिअर क्षेत्र बनत असल्याचे चित्र आहे. पूर्वी फक्त फोटोग्राफीला मागणी होती. पण आता प्रत्येक कार्यक्रमासाठी सिनेमॅटिक रिल्सची मागणी वाढली आहे. त्यामुळे युवकांना रोजगाराच्या नवीन संधी उपलब्ध होत आहेत.

# बाजारात बनावट बियाणे, खतांचा सुळसुळाट

## पेरणीपूर्वीच शेतकरी संकटात : जिल्हा गुणनियंत्रक विभाग झोपेत?

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१५अमरावती–**

जिल्ह्यातील शेतकरी आगामी खरीप हंगामाच्या तयारीला लागला आहे. बियाणे, खते, कीटकनाशके, शेती मशागतीची कामे आणि आर्थिक नियोजन यासाठी शेतकरी सध्या धावपळ करत असताना दुसरीकडे बाजारात निकृष्ट बियाणे, बनावट खते आणि कृषी साहित्याचा सुळसुळाट वाढल्याचे गंभीर चित्र समोर येत आहे. विशेष म्हणजे, याच काळात कृषी विभाग आणि गुणनियंत्रक विभागाकडून व्यापक तपासणी मोहीम राबविणे अपेक्षित असताना प्रत्यक्षात प्रशासनाची भूमिका अत्यंत निष्क्रिय असल्याचा आरोप शेतकरी आणि शेतकरी संघटनांकडून केला जात आहे. खरीप हंगाम सुरू होण्यापूर्वी मे महिन्यात कृषी विभागाने जिल्ह्यातील कृषी केंद्रे, गोदामे आणि खत-बियाणे विक्री केंद्रांची तपासणी करून उपलब्ध साठा, गुणवत्तेची पडताळणी आणि दर नियंत्रणाची अंमलबजावणी करणे




आवश्यक असते. तसेच निकृष्ट किंवा बनावट साहित्याची विक्री रोखण्यासाठी गुणनियंत्रक विभागाने नमुने तपासणीसाठी पाठविणे, अचानक छापे टाकणे आणि परवानाधारक विक्रेत्यांची चौकशी करणे अपेक्षित असते. मात्र प्रत्यक्षात अनेक भागांत शेतकऱ्यांना महागड्या दराने संशयास्पद बियाणे आणि खते विकली जात असल्याच्या तक्रारी वाढत आहेत. ग्रामीण भागातील अनेक कृषी केंद्रांमध्ये बियाण्यांचे कृत्रिम टंचाईचे वातावरण निर्माण करून जादा दराने विक्री होत असल्याची चर्चा सुरू आहे. काही शेतकऱ्यांच्या मते, कंपनीचे नाव मोठे असले तरी बियाण्यांची गुणवत्ता अत्यंत खराब निघते. उगवण कमी झाली तर शेतकरी कुणाकडे न्याय मागणार? असा सवाल उपस्थित केला जात आहे. काही ठिकाणी मुदतबाह्य किंवा निकृष्ट खतांचा पुरवठा होत असल्याचाही संशय व्यक्त होत आहे.धक्कादायक बाब म्हणजे, गुणनियंत्रक विभागाकडून वेळोवेळी कारवाईचे दावे केले जात असले तरी प्रत्यक्षात जिल्ह्यात किती कृषी केंद्रांची तपासणी झाली, किती नमुने अपात्र ठरले आणि किती विक्रेत्यांवर कारवाई झाली याबाबत स्पष्ट माहिती समोर येत नाही. शेतकरी फसला की अहवाल तयार

### निष्क्रियतेवर प्रश्नचिन्ह

अमरावती जिल्ह्यात निकृष्ट बियाणे आणि बनावट खतांचा सुळसुळाट वाढत असताना गुणनियंत्रक विभागाची कारवाई मात्र अत्यंत संथ असल्याचे दिसून येत आहे. खरीप हंगाम तोंडावर असतानाही कृषी केंद्रांवरील प्रभावी तपासण्या आणि छापेमारी होत नसल्याने शेतकऱ्यांमध्ये संताप आहे. लाखो रुपयांची गुंतवणूक करूनही शेतकरी फसवणुकीचे बळी ठरत आहेत, तर दोषींवर कठोर कारवाई होत नसल्याने संशय व्यक्त केला जात आहे. शेतकरी उद्ध्वस्त झाल्यानंतरच विभाग जागा होणार का? असा सवाल आता उघडपणे विचारला जात आहे.

होतात; पण बनावट माल विकणाऱ्यांवर कठोर कारवाई का होत नाही? असा संतप्त सवाल आता शेतकरी विचारत आहेत. मे महिन्यातच प्रशासनाने कठोर पावले उचलणे आवश्यक आहे. प्रत्येक तालुक्यात विशेष तपासणी पथके तयार करून कृषी केंद्रांवर छापे टाकावेत, बनावट बियाणे आणि खत विक्रेत्यांवर फौजदारी गुन्हे दाखल करावेत आणि दोषी कंपन्यांचे परवाने रद्द करावेत, अशी मागणी होत आहे. तसेच शेतकऱ्यांसाठी अधिकृत दरसूची सार्वजनिक करणे, नमुना तपासणी अहवाल जाहीर करणे आणि हेल्पलाईन सुरू करण्याची मागणीही पुढे येत आहे. विशेष म्हणजे, शासन शेतकऱ्यांचे उत्पन्न दुप्पट करण्याच्या घोषणा करत असताना दुसरीकडे पेरणीपूर्वीच शेतकरी निकृष्ट कृषी साहित्याच्या विळख्यात अडकत असल्याचे वास्तव समोर येत आहे. जर मे महिन्यातच प्रभावी कारवाई झाली नाही, तर खरीप हंगामात मोठ्या प्रमाणात शेतकरी फसवणुकीचे बळी ठरू शकतात, अशी भीती व्यक्त होत आहे.

### 'म्हाडा'मध्ये अतिक्रमण हटविताना हायव्होल्टेज ड्रामा

# टाकीवरून सिलेंडर फेकून केला ब्लास्ट!, परिसरात दहशत निर्माण




**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१५अमरावती–**

म्हाडा कॉलीनी परीसरात राहणाऱ्या नागरिकांच्या तक्रारीवरून गुरुवारला सकाळपासून परीसरात मनपाच्या वतीने अतिक्रमण हटाव कारवाई करण्यात आली. याठिकाणचेरोडवरील अनेक अतिक्र मणे हटविण्यात आले. मात्र एक दुकानदार शिवा परळकर यांनी पत्नीसह अतिक्रमण हटविण्याच्या कारवाईचा विरोध करीत गोंधळघालण्याचाप्रयत्न केला. एवढ्यावर हे प्रकरण थांबले नाही तर सायंकाळी संबंधित अतिक्र मण धारक दुकानदाराने एका सिलेंडरसह परीसरातील पाण्याच्या टाकीवर चढून तेथून धमक्या देणे सुरु केले. माझे पाडलेले दुकान जसेच्या तसे करून द्या...मला माझा व्यवसाय करण्याची परवानगी द्या... अन्यथा... ! असे वरून इशारे देत हंगामा केला. हा हायहोल्टेड ड्रामा पाहून पुन्हा पोलिस दाखल झाले, आणि खाली उतरण्यास सांगितले, पण तो ऐकायला तयार नव्हता... त्यानंतर रात्री ९.३० ते १० वा. सुमारास त्याने सोबत पाण्याच्या टाकीवर नेलेले सिलेंडरचे रेग्युलेटर पेटवून देत वरून खाली फेकले. सिलेंडर खाली पडताच मोठा ब्लास्ट झाल्याने परीसरात मोठी खळबळ उडाली होती.

प्राप्त माहितीनुसार, म्हाडा कॉलनी परीसरात रोडच्या कडेला अनेक खोके, दुकानाचे अतिक्रमण झाले आहे. हे अतिक्रमण हटविण्याबाबत या परीसरातील नागरिकांच्या मनपा पदाधिकारी, नगरसेवक, प्रशासनाकडे तक्रारी प्राप्त झाल्या होत्या. या तक्रारीची दखल घेत आयुक्त, अतिरिक्त आयुक्त तसेच उपमहापौर यांच्या आदेशान्वये गुरुवार १४ मे रोजी सकाळी ११:३० वाजता पासून ते दुपारी ४ वाजेपर्यंत साईनगर अकोली या रोडवर म्हाडा कॉलनी परीसरात अतिक्र मण हटाव मोहिम राबविण्यात आली होती.

विशेष म्हणजे काही लोकांचे परिसरात येणे जाण्याचे फुटपाथचे रस्त्यावर दोन ते तीन लोखंडी खोक्यावर अवैधपणे दारू विक्रीचे काम सुरू होते. त्यामुळे बरेच लोकांनी अतिक्रमण काढण्याबाबत केलेली तक्रारीवर मनपाच्या पथकाने पोलिस बंदोबस्तात तेथील लोखंडी खोके पाडून कार्यवाही केली.

### कारवाईस विरोध

दरम्यान, ही अतिक्र मण हटाव कारवाई सुरु असताना येथील एक दुकानचालक शिवा परळकर यानेवत्याच्या पत्नीनेया कारवाईविरोध करीत मोहिमेत अडथळा निर्माण करण्याचा प्रयत्न केला. मात्र पोलिस बंदोबस्तात ही कारवाई करण्यात आले.

### पाण्याच्या टाकीवर चढून धमक्या...

दरम्यान, सायंकाळी ५ वा. पर्यंत कारवाई ओटोपल्यानंतर मनपाचे पथक निघून गेले. मात्र शिवा परळकर हा परीसरातील पाण्याच्या टाकीवर गॅस सिलेंडर घेवून चढला आणि तेथून धमक्या व इशारे द्यायला लागला. मला माझे दुकान जसेच्या तसे करून द्या.. मला माझा दारु विक्रीचा व्यवसाय करण्याचा परवाना द्या... अन्यथा... अशा प्रकारचे तो वरून इशारे देत होता. त्यामुळे वातावरण चांगलेच तापले तापले होते. घटनेची माहिती मिळताच खोलापूरी गेट पोलिस स्टेशनच्या ठाणेदारांसह पोलिसांचा ताफा, क्युआरटी पथक पुन्हा या परीसरात दाखल झाले. पोलिसांकडून त्याला खाली उतरण्याच्या सूचना करण्यात आल्या, मात्र तो काहीही एक ऐकायला तयार नव्हता. शेवटी त्याने रात्री ९.३० ते १० वा. सुमारास सोबत टाकीवर नेलेल्या सिलेंडरचे रेग्युलेटर पेटवून ते खाली फेकून दिले. सिलेंडर टाकीवरून खाली पडताच मोठा ब्लास्ट झाला. या धमाक्याच्या आवाजाने परीसरात मोठी खळबळ उडाली होती. त्यानंतर काही वेळाने तो खाली उतरल्याची माहिती आहे. खोलापुरी गेट पोलिसांनी त्याला ताब्यात घेतल्याची माहिती असून पुढील तपास सुरु आहे.

# महानगरपालिकेच्या अधिकृत ओपन स्पेसवर बांधलेली जनावरे जप्त

### आयुक्त वर्षा लड्डा यांचे अतिक्रमण धारकांना कडक निर्देश

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१५अमरावती**

अमरावती महानगरपालिका आयुक्त वर्षा लड्डा यांनी नागपुरी गेट परिसर, ट्रान्सपोर्ट मार्केट परिसर, अग्निशमन केंद्र तसेच हबीब नगर येथील महानगरपालिकेच्या अधिकृत ओपन स्पेसची पाहणी करून अतिक्रमणाबाबत संबंधित विभागांना कडक निर्देश दिले.पाहणीदरम्यान हबीब नगर येथील महानगरपालिकेच्या मालकीच्या ओपन स्पेसवर बांधण्यात आलेल्या वॉल कंपाऊंडच्या आत ११ जनावरे व ६ बोकड बांधून ठेवण्यात आल्याचे निदर्शनास आले. संबंधित जनावरे तात्काळ जप्त करून महानगरपालिकेच्या गौरक्षण केंद्रावर जमा करण्यात आली. तसेच सदर जागेवरील अतिक्रमण त्वरित हटविण्याचे आदेश देण्यात आले.यावेळी आयुक्त वर्षा लड्डा यांनी अतिक्रमणधारकांना स्पष्ट इशारा देत सांगितले की, महानगरपालिकेच्या जागेवरील अतिक्रमणे स्वतःहून त्वरित हटवावीत, अन्यथा महानगरपालिकेमार्फत जप्तीची कारवाई करून पुढील कठोर प्रशासकीय कारवाई करण्यात येईल.पाहणीदरम्यान अग्निशमन केंद्रावरील कर्मचाऱ्यांची उपस्थितीही तपासण्यात आली. कर्मचाऱ्यांनी त्यांना सोपविण्यात आलेली कामे वेळेत व पूर्ण



जबाबदारीने पार पाडणे अपेक्षित असल्याचे आयुक्तांनी स्पष्ट केले. कामात कोणत्याही प्रकारचा निष्काळजीपणा सहन केला जाणार नसल्याचेही त्यांनी सांगितले.

स्वच्छता विभागालाही त्यांनी कडक शब्दांत सूचना देत साफसफाईच्या कामात हलगर्जीपणा करू नये, प्रत्येक परिसर स्वच्छ व नीटनेटका ठेवावा, असे निर्देश दिले. रस्त्यावर कचरा टाकणाऱ्यांवर दंडात्मक कारवाई करण्याचे आदेश देत सर्व स्वास्थ्य निरीक्षकांनी जबाबदारीने काम करावे, असेही त्यांनी नमूद केले.सध्या ज्या पद्धतीने काम सुरू आहे ते समाधानकारक नाही. प्रत्येक अधिकारी व कर्मचाऱ्याने दिलेली जबाबदारी प्रामाणिकपणे व प्रभावीपणे पार पाडावी, अशा शब्दांत आयुक्तांनी नाराजी व्यक्त केली.यावेळी अतिरिक्त आयुक्त शिल्पा नाईक, वैद्यकीय स्वच्छता अधिकारी डॉ. अजय जाधव, सहायक आयुक्त मनोज शहाळे, बाजार परवाना सहाय्यक आयुक्त मंगेश कडू, उपअभियंता विवेक देशमुख, उद्यान अधीक्षक अजय विंचुरकर, अतिक्रमण पथक प्रमुख योगेश कोल्हे, जनसंपर्क अधिकारी भूषण पुसदकर, ज्येष्ठ स्वास्थ्य निरीक्षक राजेश राठोड तसेच स्वास्थ्य निरीक्षक व कर्मचारी उपस्थित होते.

### हृदयद्रावक! खेळता खेळता कुलरजवळ गेला

# पाण्यात हात घालताच शॉक लागून १४ महिन्यांच्या बाळाचा मृत्यू

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१५यवतमाळ**

यवतमाळ जिल्ह्यातील घाटंजी तालुक्यातील शिरोली गावात एक अत्यंत दुर्दैवी आणि हृदय पिळवटून टाकणारी घटना घडली आहे. कुलरमध्ये आलेल्या विद्युत प्रवाहाचा जोरदार शॉक लागून अवघ्या १४ महिन्यांच्या मुलाचा दुर्दैवी मृत्यू झाला. स्वराज सुरज उले असे या मृत मुलाचे नाव असून या घटनेने त्याच्या कुटुंबावर दुःखाचा डोंगर कोसळला आहे. मिळालेल्या माहितीनुसार, ही घटना सकाळच्या सुमारास घडली. स्वराजची आई अंगणात सडा-सारवण करण्याच्या कामात व्यस्त होती, तर घरातील इतर सदस्य झोपेत होते. त्या दरम्यान स्वराज अंगणात एकटाच खेळत होता. घरातील कुलर सुरू असल्याने त्यात पाणी भरलेले



होते. खेळता खेळता स्वराज कुलरजवळ गेला. कुतूहलापोटी त्याने कुलरच्या पाण्याच्या टाकीत हात टाकला. मात्र, त्याच क्षणी कुलरमध्ये आलेल्या विद्युत प्रवाहाचा त्याला जोरदार शॉक बसला. घटना घडताच क्षणी कुटुंबीयांनी तातडीने कुलर बंद केला आणि स्वराजला त्वरित जवळच्या रुग्णालयात नेले. परंतु, डॉक्टरांनी तपासणीपूर्वीच त्याला मृत घोषित केले.

या दुर्दैवी घटनेमुळे कुटुंबीयांवर दुःखाचा डोंगर कोसळला आहे. गावातील नागरिकांनीही या घटनेबद्दल तीव्र दुःख व्यक्त केले आहे. दरम्यान, लहान मुलांच्या सुरक्षेसाठी पालकांनी अधिक सतर्क राहण्याची गरज अधोरेखित झाली आहे. विद्युत उपकरणे वापरताना योग्य काळजी घेणे, वायरिंगची नियमित तपासणी करणे आणि उपकरणे सुरक्षित स्थितीत ठेवणे अत्यंत आवश्यक आहे. स्वराजच्या निधनाने संपूर्ण परिसरात शोककळा पसरली आहे.

# नांदगाव शहरात विजेचा लपंडाव, वारंवार वीज पुरवठा खंडित

## नगराध्यक्षा प्राप्ती मारोटकर यांच्या नेतृत्वात नागरिकांची वीज कार्यालयावर धडक

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२५नांदगाव खंडेश्वर**

शहरात वारंवार वेळी अवेळी वीज पुरवठा खंडित होत असल्याने नांदगाव वासी हैरान झाले असून नगराध्यक्षा सौ. प्राप्ती मारोटकर यांच्या नेतृत्वात नागरिकांनी वीज वितरण कंपनीच्या कार्यालयावर धडक देऊन प्रचंड संताप व्यक्त करत अधिकाऱ्यांना चांगलेच धारेवर धरले दोन दिवसात वीज पुरवठा सुरळीत करावा अन्यथा तीव्र आंदोलन छेडू असा इशारा निवेदनाद्वारे दिला. गेल्या दोन महिन्यांपासून नांदगाव शहरात विजेचा लपंडाव सुरू असून शहरातील अनेक भागात दुपारी तर कधी रात्री अपरात्री वीज पुरवठा अचानक खंडित होत आहे. तापत्या उन्हात दुपारी सुद्धा वीज खंडित होत असल्याने अंगाची लाही लाही होत आहे माळी पुरा परिसर, बुधवारा चौक, बारीपुरा, ओंकारखेडा, इंदिरा आवास नगर, झोंबडी पुरा, आय टी आय,चांद पुरा इत्यादी परिसरात होल्टेज मिळत नसल्याने पंखे, एसी, टी.व्ही. कुलर, पाण्याच्या मोटारी ईत्यादी उपकरणे चालत नाही अचानक रात्री अपरात्री केव्हाही विजपुरवठा खंडित होत असल्याने नागरिक रात्री घराबाहेर काढावी लागत आहेत. तसेच शहराला पाणी पुरवठा करणाऱ्या खंडेश्वर मंदिरावरील रोहित्र वं इंदिरा



आवास नगर येथील रोहित्र वारंवार बंद राहत असल्याने पाणी पुरवठा सुद्धा विकसित झाला आहे त्यामुळे नागरिकांनी वीज वितरण कंपनीच्या कार्यालयावर धडक देऊन दोन दिवसांचा अल्टीमेट देऊन निवेदन सादर केले. यावेळी नगराध्यक्ष सौ. प्राप्ती मारोटकर, गटनेता प्रकाश मरोटकर, नगरसेवक मो. साजिद, निलेश इखार, सुमित लोमटे, कृष्णा सपकाळ, योगेश लाड, अक्षय नागोलकर, शुभम रावेकर गोपाल बनकर प्रेम हिवराळे चेतन पुंड निलेश मरोटकर, शुभम डोक, राजेश काळेकर,संजय लोमटे, अनिकेत लोमटे सह अन्य कार्यकर्ते उपस्थित होते.

### वारंवार खंडित वीज पुरवठ्यामुळे पाणीपुरवठा विस्कळीत

शहरातील पाणीपुरवठा करणारे दोन रोहित्र सतत ना दुरुस्त असतात आणि वीज वितरण कंपनीच्या हलगर्जीपणामुळे शहरातील पाणीपुरवठा विस्कळीत झाला आहे दोन दिवसात वीज पुरवठा सुरळीत न केल्यास वीज वितरण कंपनीचा वीज पुरवठा खंडित करू असा इशारा न.पं गटनेते प्रकाश मारोटकर यांनी दिला.